**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२३६/२०२३ मधील निशाणी ३४ खालील आदेश.**

(जुलेखा वि. सिराजखान )

प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदार याने पोटगीची रक्कम जमा करण्यास मुदत मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. गैरअर्जदाराचे अर्जास अनुसरुन प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराने प्रस्तुतचा मुळ अर्ज हा फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२१०/२००९ या प्रकरणात पारीत करण्यात आलेल्या आदेशानुसार पोटगीची रक्कम रुपये ७८,०००/– वसुल होवुन मिळण्याकरिता दाखल केला आहे. गैरअर्जदार हा प्रस्तुत प्रकरणात हजर आहे. परंतु, त्याने अर्जदारास अर्ज दाखल तारखेपासुन देय असलेली संपुर्ण पोटगीची रक्कम दिलेली नाही. मागील तारखेस गैरअर्जदाराने तो आजारी असल्याकारणाने पोटगीची रक्कम भरु शकत नसल्याचे कारण दर्शवुन पोटगीची रक्कम भरण्यास मुदत मिळण्याचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज न्यायालयाने नामंजुर केला आहे. त्यानंतर पुन्हा आज रोजी गैरअर्जदाराने वैद्यकीय कारणे दाखवुन पोटगी जमा करण्यास प्रस्तुतचा मुदतीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जासोबत गैरअर्जदाराने आज रोजी वैद्यकीय कागदपत्रे दाखल केले आहेत. परंतु, सदर कागपत्रावरुन गैरअर्जदाराच्या आजाराबाबत व आजाराच्या गंभीरतेबाबत कोणतेही निष्कर्ष काढता येत नाहीत. त्याचप्रमाणे केवळ आजारपणाचे कारण दर्शवुन गैरअर्जदारास अर्जदारास देय असलेली पोटगीची रक्कम जमा करणेची जबाबदारी टाळता येणार नाही.

३. आज देखील प्रस्तुतच्या अर्जात गैरअर्जदार हा आजारी असल्याचे कारण दर्शविले आहे. परंतु, गैरअर्जदारास आजारपणाच्या कारणावरुन वारंवार अर्जदारास देय असलेली पोटगीची रक्कम जमा करण्यास मुदत देता येणार नाही. परिणामी, गैरअर्जदाराचा अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP Date: 2026.03.10 12:50:49 +0530

शिरुर कासार.
दि. ०७/०३/२०२६.

**(अ. सं. जगताप)**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग,
शिरुर कासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 07/03/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 07/03/2026 |

Sd/-
**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3